14 MAY 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ कुलगुरू पदासाठी आज मुलाखती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती गुरुवार, दि. १४ रोजी घेण्यात येणार आहेत. अंतिम यादीत पात्र ठरलेल्या पाच जणांचा समावेश असून, आता यामधून विद्यापीठाच्या कुलगुरूपदी कोणाची वर्णी लागते याकडे लक्ष लागले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे प्रभारी कुलगुरू पदाचा पदभार देण्यात आला आहे. पूर्णवेळ कुलगुरूपदासाठी महिना भरापूर्वी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यातून पाच उमेदवारांची नावे अंतिम मुलाखतीसाठी निश्चित करण्यात



आली होती.

होमी भाभा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, नागपूर विद्यापीठाच्या डॉ. स्मिता देशमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या फिजिक्स विभागाचे माजी प्रमुख डॉ. संजय ढोले यांचा अंतिम यादीत समावेश आहे.

1 4 MAY 2026

# विद्यापीठाच्या विविध ३२ परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. बुधवारी १३ मेरोजी विविध ३२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ८५ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी ३३४ विद्यार्थी उपस्थित होते. बुधवारी पी.जी. फॉन्ड्री टेक्नॉलॉजी सेमी. १ आणि २, एमबीए रुरल मॅनेजमेंट सेमी. ३ अशा १६ अभ्यासक्रमांचे निकाल जाही झाले. आजअखेर २२० अभ्यासक्रमांचे निकाल झाले. १३ मेरोजी सदर पथकाकडून सांगली, सातारा व कोल्हापूर या जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद समितीतर्फे झाली नाही.